# त्वरीत पाहिजेत

अधिष्ठाता, अतिविशेषोपचार रुग्णालय यवतमाळ येथील महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेकरिता "एम.आर.आय. तंत्रज्ञ" हया पदांची कंत्राटी पध्दतीने भरती करावयाची आहे त्यासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता व इतर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदांची संख्या | वयोमर्यादा | अनुभव | दरमहा एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.आर आय.तंत्रज्ञ (वर्ग ३ ) | १) बी.पी.एम.टि (रेडिओग्राफी)/बी.एस.सी फिजिक्स<br>२)एमएस-सीआयटी परीक्षा पास | ०२ | शासन नियमानुसार | क्ष-किरण तंत्रज्ञ चा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले असावे तसेच एम.आर.आय (१.५ टेस्ला) मशिन वर ३ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक | रु.२०,०००/- (एकत्रित वेतन) |

(( सर्व साधारण अटी))

१) वरील पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होऊ शकतो. २) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.३) एमएस-सीआयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ४) ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत दिनांक व वेळेत प्राप्त होतील त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. ५) संबंधित कामाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य ६) उमेदरावारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.७) सदर पदावर कंत्राटी स्वरुपात नियुक्त झाल्यास दिवस व रात्रपाळीमध्ये काम करावे लागेल.

(( विशेष सूचना ))

१) निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांकरीता नियुक्ती आदेश देण्यात येईल. उमेदवारांचे काम समाधानकारक असल्यास एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील १२० दिवसांचे आदेश देण्यात येतील.

२) वरील शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

३) प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचा अधिकार अधिष्ठाता, अतिविशेषोपचार रुग्णालय यवतमाळ यांना आहे.

४) निवड झालेले उमेदवार निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी (करार ) स्वरुपातील असल्याने ते कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील. त्यावर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.

५) नियुक्ती झाल्यानंतर सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबीशिवाय कोणत्याही उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवले आहेत.

६) सर्व पदांना वेतन एकत्रित स्वरुपातील आहे (कंत्राटी वेतन).

७) अर्जासोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रथम/दवीतीय/तुतीय वर्षाची गुणपत्रिका, पासिंग सर्टीफिकेट, डीग्री (अत्यावश्यक), इंटर्नशिप कम्प्लीशन सर्टीफिकेट, डीप्लोमा असल्यास गुणपत्रिका व प्रमाणपत्र, वर्ग बारावीचे प्रमाणपत्र, (एम.आर.आय मध्ये काम केल्याचे) अनुभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र (टिसी/आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट पैकी कोणतेही दोन) जोडाव्यात. (उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील)

८) विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी या संस्थेच्या संकेतस्थळावर व संस्थेच्या नोटीस बोर्ड वर दिनांक 7 /12/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल व पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता सर्व मुळ प्रमाणपत्रांसह दिनांक 9 /12/२०२२ रोजी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.तसेच मुलाखतीकरीता अनुपस्थित असणाऱ्या उमेदवारांच्या अर्जावर विचार करण्यात येणार नाही

९) मुलाखतीच्या वेळेस सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक राहील व मुळ कागदपत्रे सादर न करण्याऱ्या उमेदवाराचा अर्ज अग्राह्य ठरविण्यात येईल.

१०)अर्ज सादर करावयाचा पत्ता - स्व-हस्ते अधिष्ठाता कार्यालय, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील आवक - जावक विभाग (कार्यालयीन वेळेत)

११)अर्ज कार्यालयात सादर करतेवेळी रु.२००/- चे चलन रोखा विभाग, रुग्णालय यांचे कडे भरणा करुन अर्जा सोबत पावती सादर करण्यात यावी. चलनाशिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

१२)मुलाखतीचे ठिकाण: महाविद्यालय परीषद हॉल, श्री.व.ना. शा. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

१३)अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक 28/ 11 /२०२२

१४)मुलाखतीचा दिनांक 9 / 12/२०२२ (वार: शुक्रवार )

अधिष्ठाता,
अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अधिष्ठाता,
अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ.

विषयः- एम.आर.आय. तंत्रज्ञ या पदाकरिता अर्ज...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | उमेदवाराचे नाव | | | |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता | | | |
| ३) | दूरध्वनी क्रमांक/संपर्क क्रमांक | | | |
| ४) | जात व प्रवर्गः | लिंगः- | विवाहीतः- | अविवाहीतः- |
| ५) | दि. / /२०२२ रोजीचे वय | | | |

शैक्षणिक अर्हताः

| अ. क्र. | परिक्षेचे नाव | बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी प्रथम वर्ष | टक्केवारी दूसरे वर्ष | टक्केवारी तिसरे वर्ष | टक्केवारी अंतीम वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | एमएससीआयटी | | | | | | | |
| २) | १) बी.पी.एम.टि (रेडिओग्राफी)/बी. एस.सी फिजिक्स | | | | | | | |

अनुभवः

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यालयाचा पत्ता | अनुभव कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |

अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे: १)............२)...........३)...........५)............६).............

मला पूर्णपणे जाणीव आहे की, महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेकरिता कंत्राटी पध्दतीने "एम.आर. आय. तंत्रज्ञ" पदाकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद योजनेच्या व्याप्ती प्रमाणे कमी /अधिक करण्यात येतील. ही नियुक्ती योजनेच्या अंमलबजावणीकरिता असल्याने ती योजना चालू असे पर्यन्तच असेल ही नियुक्ती पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

प्रमाणीत करण्यात येते की, या अर्जामध्ये सादर केलेली माहिती खरी असून ती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास मला सेवेस अपात्र समजून कारवाईस पात्र राहील.

स्थळः-
दिनांकः-

उमेदवाराची स्वाक्षरी
(उमेदवाराचे पूर्ण नाव..................)